# वार्तापत्र

पोलीस अधिक्षक कार्यालय,
गडचिरोली दिनांक २५/११/२०१७

उपविभाग कुरखेडा अंतर्गत पोमके कोटगुल हद्दितील मौजा कोटगुल गावामध्ये पोलीस जवान बाजार बंदोबस्त करीत असताना काल दिनांक २४/११/२०१७ रोजी नक्षल्यांनी आयईडी स्फोट घडवून आणला. या स्फोटामध्ये जिल्हा पोलीस दलाचे पोलीस हवालदार/२७२ सुरेश गावडे हे शहीद झाले. आज दिनांक २५/११/२०१७ रोजी शहिद जवान सुरेश गावडे यांच्या पार्थिवावर पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे दुपारी ०१.३० वाजेदरम्यान पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना देण्यात आली. त्यानंतर शोकसलामी देऊन बंदुकीच्या तीन फैरी हवेत झाडण्यात आल्या.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती योगिता भांडेकर, अतिरीक्त पोलीस महासंचालक (नक्षलविरोधी अभियान) श्री. कनकरत्नम, विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) श्री. शरद शेलार, जिल्हाधिकारी गडचिरोली श्री. ए. एस. आर. नायक, पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र श्री. अंकुश शिंदे, पोलीस उपमहानिरीक्षक सीआरपीएफ टी. शेखर, कमांडंट एसआरपीएफ ग्रुप १ श्री. सुनिल फुलारी, आमदार आरमोरी विधानसभा संघ श्री. कृष्णा गजबे, जि. प. उपाध्यक्ष श्री. अजय कंकडालवार, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शांतनु गोयल, जिल्हा पोलिस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, कमांडंट १९२ बटालियन सीआरपीएफ श्री. मनोजकुमार तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वरिष्ठ अधिकारी यांनी शहीद जवान सुरेश गावडे यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. तसेच जिल्हयाचे पालकमंत्री मा. राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनीही शोक संदेशाव्दारे शहीद कुटूंबियांचे सांत्वन केले आहे व कुटूंबियांची प्रत्यक्ष भेट घेणार असल्याचे कळविले आहे. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यातर्फे शहीद जवानाच्या पार्थिवावर शोकशस्त्र मानवंदना देवून त्याचे पार्थिव अंत्यविधीकरीता त्याचे स्वगावी रवाना करण्यात आले.





